विशेष पोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्राच्या अधिनस्थ असलेल्या पोलीस अधिक्षक अमरावती ग्रा., अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम यांचे आस्थापनेवरील विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात.

---

क्रमांक:- अप/कक्ष-३/भरती/ विधी अधिकारी/२०२३/ 2421 अमरावती, दिनांक 26 JUN 2023

या कार्यालयाच्या नियंत्रणाखालील पोलीस अधिक्षक अमरावती ग्रा., अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम यांचे आस्थापनेवरील खालील नमुद विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची पदे ११ महिन्याचे करारावर पुर्णत: कंत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.

| पदनाम | अमरावती ग्रामिण | अकोला | बुलडाणा | यवतमाळ | वाशिम | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन+दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| विधी अधिकारी गट-ब | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | रु. २५००० + ३०००/- |
| विधी अधिकारी | ०६ | ०४ | ०५ | ०५ | ०३ | रु. २०,००० + ३०००/- |

**सुचना:-**

1. विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरीता करावयाचे अर्ज विशेष पोलीस महानिरिक्षक अमरावती परिक्षेत्र मालटेकडी रोड, अमरावती यांचे कार्यालयात किंवा पोस्टाने दिनांक ०१.०७.२०२३ ते १५.०७.२०२३ पर्यंत १८.०० वा. कार्यालयीन वेळेत सादर करावेत.शासकिय सुटीचे दिवशी कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

2. या कार्यालयात दिनांक १५.०७.२०२३ चे १८.०० वा. नंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच पोस्टाने दिनांक १५.०७.२०२३ चे १८.०० वा.नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.

3. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे. प्रत्येक पदासाठी पात्र उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज करावेत. सदर अर्ज लिफाफयात घालुन लिफाफयावर उजव्या बाजुस ठळक अक्षरात विधी अधिकारी गट-ब पदासाठी अर्ज/विधी अधिकारी पदासाठी अर्ज असे नमुद करावे. **(दोन्ही पदासाठी एकच अर्ज नसावा)** विहीत नमुन्यातील पुर्ण भरलेल्या अर्जासोबत पासपोर्ट साईजचे २ फोटो व पत्रव्यवहारासाठी उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक पात्रता, अनुभव यांच्या सांक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्या.

4. सविस्तर जाहिरात आणी अर्जाचा नमुना १)www.igpamravatirange.gov.in २) www.amravaticitypolice.gov.in ३ www.akolapolice.gov.in ४)www.buldhanapolice.gov.in ५)www.washimpolice.gov.in ६)www.yavatmalpolice.gov.in या वेबसाईडवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या **भरावा.**

5. परिक्षा शुल्क रु. ५००/-(अक्षरी रुपये पाचशे फक्त) ठरविण्यात आले असुन, सदर परिक्षा शुल्क केवळ Demand Draft व्दारे स्विकारण्यात येतील. त्यामुळे अर्जासोबत "P.A. to Spl.I.G. of Police, A.R., Amravati" यांचे नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा Demand Draft अर्जासोबत जोडावा. अर्जासोबत Demand Draft नसलेले अर्ज बाद ठरविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या पदांकरीता शैक्षणिक अर्हता, वय व अनुभव:-**

1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व तो सनद धारक असेल.
2. विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
3. उमेदवारास गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासकीय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशा इ. बाबतीत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.
5. दोन्ही पदांसाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचेवेळी ६० वर्षांपेक्षा जास्त नसावे. किंवा

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याच प्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्तापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यांत येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**विधी अधिकारी गट-ब आणि विधी अधिकारी या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदे विषयक/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधीत अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
4. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
5. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकारणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतीम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
7. विधी विषय कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.
8. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
9. कायदा, सेवा व प्रशासनासंबंधी इतर अनुषंगीक कामे.

**अटी व शर्ती**

1. मा. सर्वोच्च न्यायालयासमक्ष न्यायप्रविष्ट असलेल्या विशेष हक्क याचीका (Civil) २४७८८ व २४७८९/२०१२ (महाराष्ट्र शासनाच्या वतीने दाखल केलेल्या) चे अंतिम आदेशास अधिन राहून सदर पदे कंत्राट पध्दतीने भरण्यात येतील.

2. सदर पदांची नेमणुक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल, उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

3. अमरावती परिक्षेत्रातील अमरावती ग्रामीण, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम या जिल्हा मुख्यालयाचे (पोलीस अधिक्षक कार्यालयात) ठिकाणी अगर नमुद जिल्हयातील तालुक्याच्या (उपविभागीय कार्यालये) ठिकाणी काम करणे बंधनकारक असेल.

4. सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथम: ११ महिन्यासाठी करण्यांत येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त ३ वेळा, ११ महिन्यांकरीता) वाढविता येईल. ३ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर अशा उमेदवारांना पुनश्च: निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

5. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायांशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिका:यांच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रदद करण्यांत येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

6. उमेदवाराची निवड लेखी परिक्षेव्दारे व मुलाखतीद्वारे करण्यांत येईल. लेखी परिक्षा ९० गुणांची (५० गुण लघुत्तरी व ४० गुण दिर्घोत्तरी) व मुलाखत १० गुणांची राहील. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेवारांपैकी, एकुण पदांच्या (विधी अधिकारी गट - ब ५ पदे व विधी अधिकारी २३ पदे) तीन पट उमेदवार लेखी परिक्षेतील मेरीटनुसार मुलाखतीसाठी पात्र ठरतील. लेखी परिक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यांत येईल किंवा या कार्यालयाच्या संकेत स्थळावर पाहता येईल.

7. हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात,किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?
होय/नाही
(अनु.१२ चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला,अटक,स्थानबध्दता,दंड,दोष सिध्दी,शिक्षादेश इत्यादींचा संपुर्ण तपशील आणि न्यायालय/विदयापिठ/प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

8. लेखी परिक्षेकरीता व मुलाखतीकरीता मुख्यत्वे खालील नमुद बाबींबर प्रश्न विचारण्यात येईल. .

अ. सेवाविषयक व फौजदारी स्वरुपाची प्रकरणे

ब. अेसीबीच्या सापळा प्रकरणात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम १९९९ मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्यास दयावयाची परवानगी

क. सेवाविषयक व फौजदारी प्रकरणातील वेगवेगळया व महत्वाच्या मुद्दयांवर सध्याची न्यायीक स्थिती (Settled position of Law)

ड. प्रचलीत फौजदारी कायदे (मेजर व मायनर अॅक्ट), मा. सर्वोच्च व उच्च न्यायालय व महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधीकरण यांचे न्यायनिवाडे.

9. उमेदवाराला निवडप्रक्रियेसाठी कोणताही प्रवासखर्च देण्यांत येणार नाही.

10. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यांत येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

11. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरीक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

12. उमेदवारांनी वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी जाहिरातीचे दिनांकापर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

13. विहीत पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले असल्यास तसेच आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती व डी.डी. नसलेले अर्ज नाकारण्यांत येईल.

**वरील पदे ही शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशीत झाले आहे. निवड प्रक्रीयेबाबतची कार्यवाही करणे, तसेच उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याचे तसेच परिक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधीका-यास राहतील.**

16.6.23

**(जयंत नाईकनवरे)**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र,अमरावती.

# अर्जाचा नमुना
## विधी अधिकारी गट-ब/विधी अधिकारी पदाकरीता अर्ज

कार्यालयीन उपयोगासाठी

1. अर्जक्रमांक ☐☐☐☐☐☐☐☐
2. अर्ज स्विकारल्याचा दिनांक ☐☐☐☐☐☐☐☐
3. अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) --------------------------------

फोटोवर स्वाक्षरी करावी

सुचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती इंग्रजीत लिहावी आवश्यक नसेल तेथे खोडावे.

अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती.

१. अर्जदारांचे संपुर्ण नाव : आडनाव नाव वडीलांचे/पतीचे नाव

मराठीत ----------------- ----------------- ---------------------------

इग्रजीत ----------------- ----------------- ---------------------------

२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३. संपर्कासाठी दुरध्वनी/मोबाईल क्रमांक ---------------------------------------------

४. जन्मतारीख(अंकात व अक्षरात) ---------------------------------------------

५. जाहिरातीचे दिनांकास वय:- -------वर्षे-----------महिने-----------दिवस

ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती.

६. शैक्षणिक अर्हता

| शिक्षण | शैक्षणिक संस्थचे नाव (विद्यापीठ/ महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तिर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत परिक्षा (एसएससी) | | | | | |
| उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (एचएसएससी) | | | | | |
| पदवी | | | | | |
| विधी पदवी | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | |
| संगणक | | | | | |

७.अर्जदाराची इतर माहिती:-

अ) सनद घेतल्याचा दिनांक :-

ब) उमेदवाराने अनुभवाचे प्रमाणपत्र जोडले आहे काय१. होय/नाही

८.

| | |
|---|---|
| अ) अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/ दंड करण्यात/सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना/निवडीना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधीकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय?. | होय/नाही |
| ब) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधीकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? | होय/नाही |

टिप:- ८ अ किंवा ८ ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपुर्ण तपशिल आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधीकरणात इ. ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.

## अर्जदाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री/सौ/कु.-----------------------------------------------------यान्द्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहीती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबतची माही काही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चूकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतची माझ्याविरुध्द कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र राहील तसेच मी भरतीप्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास अपात्र ठरेन.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही

(दिनांकासहीत)

सोबत :- अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या सांक्षाकित प्रती